C/1


# कृषि वनस्पतीशास्त्र विभाग
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला (महाराष्ट्र)

डॉ. आर. बी. घोराडे
विभाग प्रमुख

भ्रमणध्वनी : 8999291263
ईमेल : hdagbotany@pdkv.ac.in


जा.क्र. विप्र/कृवशा/ 271 /2022

दिनांक : 19/07/2022

## निविदा सुचना

**विषय:**— सन २०२२— २३ मध्ये जैवतंत्रज्ञान केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि,अकोला अंतर्गत ऊती संवर्धन प्रयोगशाळेतील ऊती संवर्धन संबधीत संपुर्ण कामे व प्रक्षेत्रावरील प्रयोगाची कुशल व अकुशल कामे कंत्राटी पध्दतीने करण्याकरिता वैध परवानाधारक कंत्राटदाराकडुन निविदा दर (कोटेशन) बोलविण्या बाबत.

**संदर्भ:**— कुलसचिव कार्यालय जा.क्रं.बीईए/आस्था/कंत्राटी/कर्म/२०२१/५९४/दि.२२ जुन. २०२१.

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,जैवतंत्रज्ञान केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि,अकोला अंतर्गत ऊती संवर्धन प्रयोगशाळेतील· ऊती संवर्धीत संपुर्ण कामे व प्रक्षेत्रावरील प्रयोगाची कुशल व अकुशल कामे कंत्राट पध्दतीने करण्याकरिता वैध पनवानाधारक कंत्राटदाराकडुन निविदा दर (कोटेशन) खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहुन मागविण्यात येते असुन निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

अटी व शर्ती

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते ५.३० या वेळेत स्विकारल्या जातील.
२. निविदा/कोटेशन विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला यांचे नावाने सीलबंद लिफाफामध्ये पाठवावी.
३. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा वैध परवाना असने बंधनकारक आहे. कंत्राटदाराला परवाना व संबंधीत इतर सर्व आवश्यक कागदपत्रे या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.
४. निविदा/कोटेशन मधील संबंधित कुशल व अकुशल कामे कंत्राट पध्दतीने करण्याचे दर नियमाप्रमाणे सर्व करांसह नमुद करण्यात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
५. कंत्राट पध्दतीने जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा संबंधीत व प्रक्षेत्रा संबंधीत कुशल व अकुशल कामे करण्यासाठी वापरण्यात येणा—या स्त्री/पुरूष मजुराचे व्यवस्थापनाची संपुर्ण जबाबदारी संबधित कंत्राटदाराची राहील.
६. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळे मधील उती संवर्धन संबधीत कामे व प्रक्षेत्रावरील कामे कुशल व अकुशल कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी कडे संबंधित कामाचा अनुभव असावा.
७. जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा व प्रक्षेत्रावरील संबंधीत कुशल व अकुशल कामे करीत असताना यंत्राचे नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवुन दिलेल्या निकषा प्रमाणे नुकसान भरपाई संबंधित कंत्राटदारकडुन वसुल करण्यात येईल.
८. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळे मधील तांत्रिक कामे व प्रक्षेत्रावरील कामे करतेवेळी कुठलीही दुर्घटना/अपघात/जिवीतहानी झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी जबाबदार राहणार नाही.
९. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि,अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा संबंधीत देण्यात आलेली कुशल व अकुशल कामे पुर्ण करण्यात यावी, कामाबाबत जैवतंत्रज्ञान केंद्रा वरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
१०. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित कंत्राटदारांना बंधनकारक राहील.
११. कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बॅंक खाते बाबतची संपुर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जानार नाही.
१२. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा संबंधीत कुशल/अकुशल कामाकरीता पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कामगाराचे देयक काम पुर्ण व विहित वेळेत पुर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतर कंत्राटी कामगाराचे देयकं पारित करण्यात येईल.
१३. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा संबंधीत कुशल/अकुशल कामे करण्यासाठी वापरण्यात येणा—या स्त्री/पुरूष कुशल/अकुशल कामगारांना, क मगार (**Labour Act**) कायद्यानुसार किमान वेतन, विमा संरक्षण,भविष्य निर्वाह निधी देणे,कॅशलेस पध्दतीचा अवलंब करणे इत्यादीची संपुर्ण जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील.

१४. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा येथे कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी, विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग व मा. अधिष्ठाता (कृषि) डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. अधिष्ठाता (कृषि) डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१५. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा संबंधीत कुशल /अकुशल कामे हि एक वर्षामधील ऊती संवर्धीत संपुर्ण कामे व खरीप, रब्बी, व उन्हाळी या तिन्ही हंगामा करिता असुन कुशल/अकुशल कामगाराचे दर एक वर्षा करीता वैध राहतील.

१६. विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळा संबंधीत कुशल/अकुशल कामे करण्यासाठी पुरविण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी हे १८ वर्षाच्या वर असावे तसेच ६० वर्षापेक्षा कमी असावे व त्यास कोणत्याही प्रकारचे अपंगत्व नसुन ते शारीरिक दृष्ट्या सक्षम असावे.

१७. कंत्राटदाराला देय रकमेच्या १० टक्के रक्कम अमानत रक्कम म्हणुन प्रभारी अधिकरी यांचे कडे जमा करावी लागेल.

१८. कोणत्याही निविदा पुर्णपणे किंवा अंशतः स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला यांचेकडे राखुन ठेवलेले आहेत.

१९. निविदा प्रक्रिया राबवितांना तांत्रिक अथवा प्रशासकीय अडचण आल्यास निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर थांबविण्याचे अथवा रद्द करण्याचे पुर्ण अधिकार विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला यांचेकडे राखुन ठेवलेले आहेत.

२०. समान निविदा असल्यास त्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. या बाबत विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि, अकोला तसेच निविदा समितीचा निर्णय बंधनकारक राहील.

२१. सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे व संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असल्याचे रू.१०० चे स्टॅप पेपर व करारनामा सादर करणे संबंधित कंत्राटदारास बंधनकारक राहील.

२२. कंत्राटदार अथवा कंत्राटदाराकडुन पुरविण्यात येणारे कंत्राटी कर्मचारी/मजुर विद्यापीठाकडे कायमस्वरूपी नेमणुकी करीता दावा करण्यास पात्र राहणार नाही.

२३. निविदा धारकाने सादर केलेल्या सर्व कागदपत्रांची जवाबदारी त्यांची स्वतःची राहील खोटे कागदपत्र सादर केल्याचे कोणत्याही टप्पावर दिसुन आल्यास ते अटीशर्तीचा भंग समजुन त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही केली जाईल.

वरील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहुन सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दिनांक 27/07/22 रोजी सायंकाळी ५:३०पर्यंत कार्यालयीन वेळेत विभाग प्रमुख, कृषि वनस्पतीशास्त्र विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि, अकोला या कार्यालयात निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

विभाग प्रमुख,
कृषि वनस्पतीशास्त्र विभाग,
डॉ. पं.दे.कृ.वि, अकाला.

# निविदा (कोटेशन) मसुदा

विभाग प्रमुख कृषि वनस्पतीशास्त्र विभाग डॉ. पं.दे.कृ.वि,अकोला अंतर्गत जैवतंत्रज्ञान केंद्र प्रयोगशाळेतील ऊती संवर्धत संबधीत संपुर्ण कामे व प्रक्षेत्रावरील प्रयोगाची कामे कुशल/अकुशल कामे कंत्राट पध्दतीने करण्याचे दर खालील प्रमाणे

| अ.क्र. | कामाचा प्रकार | शेरा | दर (रूपये प्रति दिन प्रति महिना) |
|---|---|---|---|
| १ | **कुशल कामगार**<br>प्रयोगशाळेतील प्रयोगाचे आयोजन करणे, प्रयोगशाळेची व उपकरणाची निगा राखने, (ऊती संवर्धन संबधीत कामे. उदा. इनोकुलेशन,सबकल्चरींग,मिडीया तयार करणे,स्टरीलायजेशन, डिकंटॅमिनेशन,हार्डनिंग,बॉटल वाशिंग करणे व वरिष्टांनी दिलेली कामे वेळोवेळी करणे ईत्यादी.) | प्रति दिन प्रति महिना | |
| २ | **अकुशल कामगार**<br>(प्रक्षेत्रावरील प्रयोगाची कामे उदा. प्रयोगाची आखणी करणे, प्रयोगाची लागवड करणे, निंदन करणे, प्रयोगाला पाणी देणे, फवारणी करणे, प्रयोगाची हार्वेस्टिंग करणे,बियाण्याची साफसफाई करणे, ग्रीन हाउस व पॉली हाउस मध्ये प्रयोगाची देखभाल करणे प्रयोगशाळेची साफसफाई करणे ईत्यादी.) | प्रति दिन प्रति महिना | |

टिप : किमान वेतन कायदा **(Minimum Wages Act)** च्या पेक्षा कमी नसावे.

निविदा सुचनेमधील संपुर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

ठिकाण :

दिनांक :

स्वाक्षरी

नाव व सुपुर्ण पत्ता